काजव्यांचा दिवा

मूळ गोष्ट- शुलमीथ ऑपनहेम

अनुवाद- प्रतिक्षा खासनीस





काजव्यांचा दिवा




नाथन ने विचारलं,

"जेव्हा बाबा या घरात रहात होते, तेव्हा ते माझ्याएढेच होते का?"

आजी हसली, "हो, बरोबर. जेव्हा आम्ही या घरात रहायला आलो, तेव्हा तुझे बाबा सहा वर्षांचे होते."






"मी पण सहा वर्षांचा आहे" नाथन म्हणाला.

"हा, बरोब्बर" असं म्हणत आजीनं नाथनच्या गालावर पप्पी दिली.

"जेव्हा बाबा सहा वर्षाचे होते, तेव्हा त्यांना सगळ्यात जास्त काय आवडायचं?" नाथन ने विचारलं.

"काजवे" आजीनं उत्तर दिलं.




संध्याकाळी जेव्हा हळूहळू अंधार पडायला लागायचा, तेव्हा मी, तुझे बाबा आणि आजोबा अंगणात जायचो.

त्या अंधार छोटे-छोटे काजवे, गवतातून लुकलुकताना दिसायचे.


मग तुझे बाबा, चार-पाच काजवे पकडून एका काचेच्या बाटलीत बंद करून, त्या काजव्यांचा दिवा बनवायचे.

त्या काचेच्या बाटल्या मी अजून जपून ठेवल्यात.




हे ऐकून नाथन आनंदानं उड्याच मारायला लागला.

"आजी, जा ना, आतमधून त्या काचेच्या बाटल्या आण, बघ आता लवकरच अंधार पडणार आहे."



मग, आजी, आजोबा आणि नाथन पायात चप्पल न घालता तसेच गवतावर बसले. सगळं आभाळ लाल-लाल झालं होतं. अंधार पडायची वाट बघत ते तिघे तसेच बसून होते.



तेवढ्यात एक शेणकिडा नाथनच्या पायावर चढला.
गोल्डफ्लिंच पक्षी पांढऱ्या फुलावर उडायला लागला.
एक फुलपाखरू पंख फडफडवत त्याच्या समोरून निघून गेलं.
जवळच्या तलावातल्या बेडकांचा आवाज येऊ लागला,
गुड नाईट, गुड नाईट



अशा प्रकारे अजून काही वेळ निघून गेला.
नाथन आपले पाय हलवायला लागला.
त्याच्या पायावरचा शेणकिडा हळूच खाली पडला.
नाथन आजोबांचा कोट ओढायला लागला, तेव्हा आजोबा
म्हणाले, "अजून फक्त थोडा वेळ."



मग अजून काही मिनिटं गेली.
आज्जीचा हात ओढत नाथन म्हणाला,
"आता तर अंधार झाला, मग काजवे
अजून का आले नाहीत?"
"बघ, आता लवकरच ते येतील" आजी
आणि आजोबांनी मान हालवली.



आणि मग काहीच वेळात,

एक, दोन, तीन, चार काजवे चमकताना दिसले.

आता तर गवताना खूप सारे काजवे लुकलुकत होते.

नाथन आणि आजी गवतातून पुढे चालायला लागले. "हळू, हळू चाला" आजोबा म्हणाले, "आजीला बाटली पकडू दे."



मग नाथनच्या हातावर एक काजवा येऊन बसला.
"आजोबा, मला काजवा सापडला. मला याला
लुकलुकताना बघायचंय."
"जरा हळू, नीट पकड त्याला" आजोबा म्हणाले.



पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती.
नाथनच्या हातातून काजवा उडून गेला.
गालातल्या गालात हसत आजी म्हणाली,
"एकदम तुझ्या बाबांसारखा."






"काजवा हातावर बसला की हळूच त्याला या बाटलीत टाक" आजोबा नाथनला म्हणाले.


पुढच्यावेळेस नाथन ने अगदी असंच केलं.

आणि थोड्यावेळात ती काचेची बरणी दिव्यासारखी चमचम करायला लागली.



काजव्यांचा हा दिवा त्यांनी पलंगाजवळ ठेवला.
आजीनं नाथनच्या अंगावर पांघरूण घातलं.
आजोबांनी त्याच्या गालांची पप्पी घेतली.
"माझ्यासोबत काजवे बघायला तुम्हाला मजा आली?" नाथन ने विचारलं.
"हो तर, खूप मजा आली"
"बाबांसोबत जितकी मजा यायची तेवढीच?"
"हो, तेवढीच"
"मी झोपलो ना की तुम्ही या काजव्यांना
बाहेर सोडून द्या, चालेल?"
आजी आणि आजोबा हसायला लागले.
"तुझे बाबा पण नेहमी असंच म्हणायचे."





"मी आता आई, बाबांना आपल्या काजव्याचा दिव्याबद्दल सांगेन" बोलता-बोलता नाथनला आता जांभई यायला लागली.

मग तो काजव्यांचा दिवा त्यानं उशीपाशी ठेवला आणि त्यावर हळूच गाल घासला.

"आजी, ही काचेची बाटली तू तशीच ठेवलीस त्यामुळं किती मजा आली ना?"

"हो, खूप मजा आली" आजी-आजोबा म्हणाले आणि दबक्या पावलांनी खोलीबाहेर निघून गेले.



